महाराष्ट्र शासन
# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Ph.No : (0721) 2573027, 2572577 Website: www.jdroamt.org Email: roamravati@dtemaharashtra.gov.in
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कालमर्यादीत

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२४/ 2956
दिनांक :- 23 SEP 2024

प्रति,

प्राचार्य,
सर्व औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील १२ वी नंतरचे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवीका अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेश प्रक्रियेसाठी संस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

संदर्भ :- १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्र. :- २/एनजीसी/Intake App/२०२४/४४० दिनांक ३/७/२०२४.
२. या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२४/१६३५ दि. ५ जुलै २०२४.
३. विकाअ/शिक्षण/२०२४/२१२० दिनांक २८ ऑगष्ट २०२४.
४. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १०/एनजीपी/प्रवेशक्षमता/औषधनिर्माणशास्त्र पदवीका/२०२४/४५४ दिनांक २० सप्टेंबर २०२४.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील १२ वी नंतरचे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवीका अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेश प्रक्रियेकरीता सहभागी असणा-या संस्थांची प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचुक व अद्ययावत असने आवश्यक आहे संस्था बाबतची औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता फार्मसी कॉन्सील ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परीषदेची मान्यता, शासन मान्यता व त्यानुसार संबंधीत मंडळाचे सलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती तसेच त्यासोबतची संस्थेची सांख्यिकी माहिती तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांच्या https://approval२४.dtemaharashtra.gov.in या लिंकवर दिनांक ०३/०९/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अद्ययावत सादर करण्याबाबत तसेच या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहुन कन्फर्म करण्याबाबत कळविलेले होते. तथापी ब-याचश्या संस्थांनी अजुनपर्यंत सदर माहीती अद्ययावत केलेली दिसुन येत नाही.

फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीताची जवळपास सर्व विद्यमान संस्थेची मान्यता प्रक्रिया पुर्ण झालेली असल्याचे कळविलेले आहे. त्याचप्रमाणे सर्व प्रवेश नियामक प्राधिकरणांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता फॉर्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या संस्थामध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु करण्याची विनंती केलेली आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाव्दारे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अंतिम गुणवत्ता यादी पर्यंतचे वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आलेले आहे. तसेच कॅपच्या विविध फेरीकरीता विकल्प अर्ज (ऑप्शन फार्म) भरणे, कॅप जागावाटप, जागा स्विकृती करणे, उमेदवारांने वाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे, प्रवेशाची अंतिम तारीख इत्यादीबाबतचे पुढील वेळापत्रक संचालनालयाव्दारे लवकरच प्रसिध्द करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम राबविणा-या सर्व संस्थाचे प्राचार्यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता फॉर्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली य शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची सलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहीती व प्रवेशक्षमता अद्ययावत करुन **दिनांक २७/०९/२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** ऑनलाईन पध्दतीने सादर करुन या कार्यालयाव्दारे पडताळणी व प्रमाणित करुन घ्यावी.

ज्या संस्था वरील नमुद दिनांकापर्यंत प्रवेशक्षमतेची माहीती अद्ययावत करणार नाहीत तसेच या कार्यालयाव्दारे प्रमाणित करुन घेणार नाहीत, अश्या संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत केला जाणार नाही, त्यामुळे होणा-या परिणामास सर्वस्वी जबाबदारी सबंधित संस्थेची राहील. याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

**(मनोज म अंधारे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर.** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.